मू. ओ. श्रीजियति जयांचेनि बोभाटें । आत्मयाची झोंप लोटे ॥
तरी ऋण न फिटे । चेणेंचिनींद ॥ १ ॥

सं. श्लो. यासां कोला हृनेनात्मा गत निद्रोभवेत्परम् ॥
वाग्भिर्ऋणान्न मुक्तः स्याज्जागृतिः सुप्तिरेव सा ॥ १ ॥

मू. ओ. एवं पराधिका चौथी । जीव मोक्षाचा उपयोगी ॥
अविध्येचें सवें अंगीं । वेंचती कीर ॥ २ ॥

सं. श्लो. परादिका श्चतस्रस्तु । जीवमोक्ष प्रयोजनम् ॥
अविध्या सहिताः स्वांगे । व्ययं संप्राप्नुवंति हि ॥ २ ॥

मू. ओ. देहासवें हातपाये । जाती मनासवें इंद्रियें ॥
नातरी सूर्यासवें जाये । किरण जाळ ॥ ३ ॥

सं. श्लो. हस्तांघ्रयश्च देहेनेंद्रियाणि मनसासह ॥
यथायथैव निर्यांति । रविणासह रश्मयः ॥ ३ ॥

मू. ओ. नातरी निद्रेचिये अवधि । स्वप्नें सरती आधी ॥
तेविं अविध्येच्चिये संबंधीं । आटती इया ॥ ४ ॥

सं. श्लो. निद्रावसानात्प्रथमं । नश्यंति स्वप्नदृष्टयः ॥
तथैव विध्यासार्धं । नश्यंत्येताः परादयः ॥ ४ ॥

मू. ओ. मृतें लोहें होतीं । तीं रसरूपें जितीं ॥
जळों इंधनें येती । वान्हिदशे ॥ ५ ॥

सं. श्लो. रसरूपेण जीवंति । मृतलोहादिधातवः ॥
दग्धेंधनानि संयाति । यथा वन्हिदशां पुनः ॥ ५ ॥

मू. ओ. लवण आंगे विरें । परि स्वादें जळीं उरें ॥
नींद मरूनि जागरे । जिये जे नींद ॥ ६ ॥

सं. श्लो. जले विसृत्य लवणं । स्वादरूपेण शिष्यते ॥
यथा जाग्रत्स्वरूपेण । गता निद्रावशिष्यते ॥ ६ ॥

मू. ओ. तेवि अविद्ये सर्वे । चौघींवेंचती जीवें ॥
तत्वज्ञानाचे नावें । उठतीच कीं ॥ ७ ॥

सं. श्लो. तथैवा विद्ययासार्वे । चतस्रस्त्यक्तजीविताः ॥
तत्वज्ञानस्य नाम्नावै । व्युत्तिष्ठंति स्वयं पुनः ॥ ७ ॥

मू. ओ. हा तत्वज्ञान दिवा । मरोनि इहीं लावावा ॥
तरी हाही शीणलेवा । बोधरूपेची ॥ ८ ॥

सं. ओ. अभिमृत्वा लापनीय । स्तत्वज्ञानप्रदीपकः ॥
अयं तर्हि श्रमोलेपो । बोधरूपेण तात्विकः ॥ ८ ॥

मू. ओ. येउनी स्वप्न मेळवी । गेलिया आपणपां दावी ॥
दोही दिठी नांदवी । नींद जैसी ॥ ९ ॥

सं. श्लो. आगत्य मेलयेत्स्वप्नं । गतात्मानंच दर्शयेत् ॥
द्वयं दृष्ट्या नंदयति । तथा निद्रा हि देहिनाम् ॥ ९ ॥

मू. ओ. जिती अविद्या ऐशी । अन्यथा बोधें गीवसी ॥
तेचि यथा बोधेंसी । निमाली उठी ॥ १० ॥

सं. श्लो. एवमविद्या जीवती ह । अन्यथा बोधकारिणी ॥
तदेवोपरता साच । यथा बोधेन तिष्ठति ॥ १० ॥

मू. ओ. परी जीती ना मेली । अविद्या हे जाकळी ॥
बंध मोक्षा घाली । बांधोनिया ॥ ११ ॥

सं. श्लो. अमृता वा मृतावापि । ह्यविद्या न विमुंचति ॥
बंधे मोक्षेच क्षिपति । जीवं बध्वा सुदारुणा ॥ ११ ॥

मू. ओ. मोक्ष च बंध होये । तरी मोक्ष शब्द का साहे ॥
परी अज्ञान घरीं त्राय । वाउगीयाची ॥ १२ ॥

सं. श्लो. मोक्षोऽपि बंधरूपः स्या । त्तदा मोक्षाभिधा कथम् ॥
अज्ञानिनां गृहे तावत् । प्रसिद्धिरनयो र्वृथा ॥ १२ ॥

मू. ओ. बागुलाचेनि मरणें । तोषावें कीं बाळपणें ॥
येरा तो नाहीं मा कवणें । मृत्यु मानावा ॥ १३ ॥

सं. श्लो. मृतं बागुलकं श्रुत्वा । यथा हृष्यति बालकः ॥
इतरस्य स नास्तेव । तन्मृत्युः केन मन्यताम् ॥ १३ ॥

मू. ओ. घटाचें नाहीं पण । फुटलेयाची नागवण ।
मानिती असें ते जाण । म्हणों ये कीं ॥ १४ ॥

सं. श्लो. स्फुटितं घटनास्तित्व । मिति मत्वा न शोचति ॥
यः पुमान्स परिज्ञाता । इति तं भण्यतां कथम् ॥ १४ ॥

मू. ओ. म्हणोनी बंधाचि तंव वावो । मा मोक्षा के प्रस्तावो ॥
मरोनि केला ठावो । अविध्या तया ॥ १५ ॥

सं. श्लो. अतो न वास्तवो बंधः । कुतो मोक्षस्य संभवः ॥
अविध्यकौ बंधमोक्षौ । अज्ञानजनमोहकौ ॥
वा अविध्याया कृतं स्थानं । मृत्वा तस्य विनिश्चितम् ॥१५ ॥

मू. ओ. आणि ज्ञान बंध ऐसें । शिवसूत्राचेंनि मिषें ॥
म्हणीतलें ऐसें । श्री सदाशिवें ॥ १६ ॥

सं. श्लो. शिवसूत्रमिषेणेदं । ज्ञानं बंधकरंत्विति ॥
प्रोक्तं सदाशिवेनापि । तस्मात्बंधकरं ध्रुवम् ॥ १६ ॥

मू. ओ. आणि वैकुंठीचें सुजाणें । ज्ञानपाशीं सत्वगुणें ॥
बांधिजे हें बोलणें । बहु केलें ॥ १७ ॥

सं. श्लो. ज्ञानं बंधकरं सत्व-। गुणपाशेन निश्चितम् ॥
प्रोक्त भागवताप्येतत् । गीतायामर्जुनं प्रति ॥ १७ ॥

मू. ओ. परि शिवें कां श्री. वल्लभ । बोलिलें येणेंचि लोभें ॥
मानू तें हें लाभें । न बोलतां ही ॥ १८ ॥

सं. श्लो. शिवकृष्णा वुभावेतत् । प्रोक्तवंतावतो वयम् ॥
स्वीकुर्मस्तत्तथैवास्ते । नोचतु र्यदितावुभौ ॥ १८ ॥

मू. ओ. जें आत्मज्ञान निखळ । तेंही घे ज्ञानाचें बळ ॥
तैं सूर्य चिंती सबळ । तैसें नोहें ॥ १९ ॥

सं. श्लो. ज्ञानस्वरुप आत्मापि । लिप्सेज्ज्ञान बलं यदि ॥
सूर्यश्चितयति प्रात । स्तथा किं न भवेदिदम् ॥ १९ ॥

मू. ओ. ज्ञानें श्लाघतू आहे । तैं ज्ञान धाडिलें वाये ॥
दीपावांचूनि दीप लाहे । तैं अंग भुलला कीं ॥ २० ॥

सं. श्लो. ज्ञानेन श्लाघते ह्यात्मा । तदा ज्ञानं वृथा गतम् ॥
दीपश्चापेक्षते दीपं । आतमंगं तदा निजम् ॥ २० ॥

मू. ओ. आपण पैं आपणापाशीं । नेणतां देशोदेशीं ॥
आपण पैं गंविसी । हें कीर होय ॥ २१ ॥

सं. श्लो. स्थितं समीपमात्मानं । न ज्ञात्वा मोहितः पुमान् ॥
गवेषयति चान्यत्र । स्वात्मानं किमिदंभवेत् ॥ २१ ॥

मू. ओ. परि बहुता काळिया । आपणपें आठवलिया ॥
म्हणे आजि मी यया । कैसा रिझों ॥ २२ ॥

सं. श्लो. कदाचिद्बहु कालेन । स्मृत्वाचात्मानमात्मना ॥
अध्यात्मस्मरणेनाहं । हृष्येय मनुतेन किम् ॥ २२ ॥

मू. ओ. तैसा ज्ञानरुप आत्मा । ज्ञानेचि आपुली प्रभा ।।
करीतसे सोहं मा । ऐसा बंधू ।। २३ ।।

सं. श्लो. आत्मा ज्ञानात्मकस्तद्वत् । ज्ञानेनैवात्मनः प्रभाम् ।।
करोति सोहमस्मीति । बोधोयमपि बंधकः ।। २३ ।।

मू. ओं. जें ज्ञान स्वयें बुडें । म्हणोनि मारी नावडे ।।
ज्ञानें मोक्ष घडे । तें निमालेनि ॥ २४ ।।

सं. श्लो. स्वयं मज्जति च ज्ञानम् । भारभूतमतोऽप्रियम् ।।
निवृत्तेनैव ज्ञानेन । मोक्षमाप्नोति निश्चितम् ।। २५ ।।

मू. ओ. म्हणोनि परादिवाचा । तो शृंगार चौ अंगाचा ।।
एवं अविद्या जीवाचा । जीव त्यागी ।। २५ ।।

सं. श्लो. तस्मात्परादिका वाच । श्चतस्त्रांग विभूषणाः ।।
जीव भावस्य संत्यागे । वीतः सार्धमविध्यया ।। २५ ।।

मू. ओ. अंगीचे इंधनें उदासु । उठूनि ज्ञानाग्नि प्रवेशु ।।
करी तेथ भस्म लेपु । बोधाचा उरे ॥ २६ ।।

सं. श्लो. निजांगेंधनसंभूते । ज्ञानाग्नौ प्रविवेश सा ।।
तत्र दग्ध्वा भस्मलेशो । बोधस्यैवावशिष्यते ॥

मू. ओ. जळीं जळा वेगळु । कापुर न दिसे अढळु ।।
परि होउनि परिमळु । उरे जेवीं ।। २७ ।।

सं. श्लो. यथा जले जलाद्भिन्नः । कर्पूरो नैव दृश्यते ।।
तथापि तत्पृथक्त्वेन । सौगंध्यमपि लभयते ।। २७ ।।

मू. ओ. अंगी लाविलिया विभूती । ते परमाणुही झडती ।।
परी पांडुरत्वें कांती । राहे जैसी ।। २८ ।।

सं. श्लो. चर्चितांगविभूतेस्तु । नश्यंति परमाणवः ॥
परंतु पांडुरत्वेन । या कांतिः सा स्थिरायते ॥ २८ ॥

मू. ओ. ना बोहळा अंगीं जैसें । पाणी पाणीपणें नसें ॥
तरी बोलीचेनि मिषें । आथी च तें ॥ २९ ॥

सं. श्लो. यथा जलं स्वरूपेण । नासीद्भूमौ तथापि हि ॥
आर्द्रताव्याजतस्तस्यां । तदस्तीत्य-वगम्यते ॥ २९ ॥

मू. ओ. नातरी माध्यान्हकाळीं । छाया न दिसे वेगळी ॥
असे पायतळीं । रिघोनिया ॥ ३० ॥

मू. श्लो. न दृश्यते पृथक् छाया । मध्यान्हे स्वतनोः परम् ॥
पादमुले प्रविश्यासौ । गुप्ता संतिष्ठते यथा ॥ ३० ॥

मू. ओ. तैसें ग्रासोनि दुसरें । स्वरुपें स्वरुपाकारें ॥
आपुलेपणें उरें ॥ बोध जो कां ॥ ३१ ॥

सं. श्लो. ग्रसित्वा हि तथा द्वैतं । स्वरुपे तत्प्रकारतः ॥
केवलात्मत्व मात्रत्व । बोधोयः सोव शिष्यते ॥ ३१ ॥

मू. ओ. तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनिया ॥
तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥ ३२ ॥

सं. श्लो. ऋणशेषं निस्तारितुं । वाचो मृत्वा न शक्नुयुः ॥
मया तन्मोचितं नूनं । पतित्वा गुरुपादयोः ॥ ३२ ॥

मू. ओ. म्हणोनि परा पश्यंति । मध्यमा हन भारती ॥
या निस्तरलिया लागती । ज्ञानाज्ञानी ॥ ३३ ॥

सं. श्लो. अतःपराद्यो वाचा । समर्था नात्म दर्शने ॥
आसां निस्तरणं ताव । ज्ज्ञानाज्ञाने सुनिश्चिते ॥ ३३ ॥

मु. ओ. इतिश्री ज्ञानदेव बिरचिते । अमृतानुभव राजयोग ॥
वाचां ऋणमोचनं नाम । तृतीयं प्रकरणम् ॥ २४ ॥

सं. श्लो. तृतीयेस्मिन्प्रकरणे । ज्ञान देवो गिरामृणम् ॥
मुक्तवान्सद्गुरोः पाद । वंदनेवैव केवलम् ॥ २४ ॥

इतिश्री प्रल्हादकृतानुभव समश्लोक्यां वागृणनिवे-
दनं तृतीयं प्रकरणम् ॥

शुभं भवतु.

# महायात्रा

(शके १८६१ चैत्र)

लेखक:—श्रीकृष्ण दामोदर महाजन, नाशिक

अलीकडे यात्रा किंवा महायात्रा करणें फार सुलभ झालें आहे. आगगाड्या—मोटारगाड्यामुळें प्रवासांत बिलकुल त्रास होत नाहीं. असें म्हटलें तरी चालेल. ही साधनें नव्हती त्यावेळीं पायीं—पायीं फारतर बैलगाडीनें प्रवास करावा लागत असे. शेकडो लोकांना पायी—पायीच यात्रा कराव्या लागत तेव्हां थंडी, ऊन पाण्याचा आभाव सोबत इत्यादि नाना प्रकारचे त्रास सोसावे लागत पण भाडेखर्च फारसा हात नसे. त्यामुळें ते पैसे क्षेत्रांत दानधर्म करण्यास मन मोकळें असे. अलीकडे आगगाडी—मोटार इत्यादि भाड्यांत कल्पनेबाहेर खर्च होतो त्यामुळें बहुतेक लोक क्षेत्रांत दानधर्म करण्यांत अर्थात उपाध्यास [ पंड्यांस ] देण्यांस फार काटकसर करतात.

अलीकडे दानधर्मावर यात्रेकरांची श्रद्धां कमी असें पुष्कळ लोक म्हणतात. परंतु हें म्हणणें यथार्थ नाहीं. क्षेत्रस्थ उपाध्याय म्हणतात—अहो इतक्या लांब तुम्हीं येतां रेल्वे—मोटार—हॉटेल इत्यादि खर्च नाक दाबून लागेल तितका करितां आणि क्षेत्रांत दान-धर्माची काटकसर करतां हें ठीक नाहीं. ह्या टीकेला एकच उत्तर व तें योग्य आहे की यात्रस्थ लांबलांबच्या देव दर्शनास व तीर्थस्नानास येतात त्या येण्याकरितां [ जाण्या-करितां ] क्षेत्राच्या ठिकाणीं अल्पसा दानधर्म करण्याकरितां यात्रस्थाला किती खर्च करावा लागतो याचा निर्विकल्प बुद्धीनेंच विचार करावा. वस्तुतः भाडे खर्चामुळेंच प्रवासी इतका त्रस्त होतो कीं शेवटीं कित्येक ठिकाणी देव—ब्राम्हणांपुढें मस्तक लववून हात जोडावे लागतात. अशा रीतीनें क्षेत्रस्थ उपाध्याय आणि याचक जनांची हीन स्थिति झाली आहे.

पूर्वीं भाडेखर्चात पैसे न जातां देव ब्राम्हण याचक दानधर्म इत्यादि करून क्षेत्रस्थ उपाध्यायांकडे यात्रस्थ आपण होऊन जात असत. परंतु अलीकडे जास्त [ सुधारलेल्या ] धर्मशाळा—खानावळी—चहाकॉफी फराळाची दुकानें ठिकठिकाणीं झाल्यामुळें प्रवासी कोठें-तरी उतरतात स्नान जेवण देवदर्शन करून परभारे परत अगर पुढे जातात. क्षेत्रस्थ उपाध्यायांकडे फार कमी लोक जातात. अशा रीतीनें क्षेत्रस्थांचें उत्पन्न कमी होऊन यात्रे-करूं आपलेकडे यावेत अशा आशेनें क्षेत्रस्थ उपाध्यायांना रेल्वेस्टेशनावर, मोटार

आड्यावर फिरून यात्रेकरूस "आमचे घरीं चला" असें म्हणणें भाग पडतें, ह्यांत कोणाचाच दोष नाहीं.

महायात्रा म्हणजे प्रयाग–काशी–गया [ ही काशीयात्रा ] आणि रामेश्वर असाच कित्येकांचा समज आहे, काशी–प्रयाग–गया ही त्रिस्थळी हीच महायात्रा म्हणून असेंही कित्येक समजतात. परंतु महायात्रा म्हणजे चारधामः—त्यांत द्वारका, सिद्धपूर ( मातृ-गया ), बद्रिनारायण; हरिद्वार, प्रयाग–काशी--गया ( ही त्रिस्थळी ) पूरी--जगन्नाथ, रामेश्वर आणि नाशिक हीं तीर्थक्षत्रें आहेत. कोणतीही यात्रा करावयाची तरी प्रथम मातृगया केलीच पाहिजे. नंतर पितृगयाश्राद्ध सरते शेवटीं श्रीक्षेत्र नाशिक येथें गंगाभेट झालीच पाहिजे. हरिद्वार–प्रयाग व बद्रिनारायण ह्यांपैकी कोठूनही गंगा आणावी व ती गोदावरीला भेटवावी. आणि तशी गंगाभेट प्रत्येकाने केलीच पाहिजे.

शिवाय बद्रिनारायण–हरिद्वार अथवा प्रयाग येथून घेतलेली गंगा [ त्यांतील कांहीं भाग ] रामेश्वराला स्नान घालण्यास द्यावी लागतें. रामेश्वरच्या पद्धतीप्रमाणें गंगा भरलेले स्वतंत्र भांडे तोंड बंद केलेले प्रथम तेथील मंदिराचे पंचास दाखवावें लागते. त्यांच्या परवानगीनें तें भांडे तसेंच्या तसें पुजाऱ्याजवळ द्यावें लागते आणि तेथील देवस्थानचे पुजारी भांड्याचे तोंड उघडून गंगेचे पाणी श्रीरामेश्वरावर आपले समक्ष घालतात. तें भांडें रिकामें परत देत नाहींत. तें मंदिरांत ठेवून पुढें त्या व तशा भांड्याचा लिलाव करून येतील ते पैसे मंदिराच्या उत्पन्नांत जमा करितात. तसा लिलाव यात्रेकरूलासुद्धां घेतां येतो.

रामेश्वराचें पुढें धनुष्यकोटि ह्या ठिकाणीं जाऊन तेथें समुद्रस्नान करून तेथील सेतु [ सेतु म्हणजे त्याच ठिकाणच्या समुद्रांची रेति ] पूजा करून तेथें त्या सेतूचे तीन भाग करावे लागतात. एकभाग तेथील उपाध्यायास दुसरा भाग रामेश्वर मंदिरांतील एका देवास आणि तिसरा भाग यात्रेकरूनीं आपले बरोबर ( कोरलेल्या नार-ळांत भरून ) आणून तो प्रयागला नेऊन त्रिवेणी संगमांत टाकावा लागतो.

अशा रीतीनें प्रयागची गंगा रामेश्वराला घालून तेथील सेतू प्रयागला त्रिवेणी संग-मात पोचविला म्हणजे पूर्ण यात्रा होतें. तसेंच प्रथम रामेश्वर करून सेतू प्रयागला पोचवून तेथील गंगा रामेश्वरास पोचविली म्हणजेंही पूर्ण यात्रा होते. दोनहीं प्रकार इष्ट व समसमान मानलें जातात. मात्र वर लिहिलेप्रमाणें कोणतीही यात्रा करण्यापूर्वीं आधीं मातृगया करावी व शेवटीं नाशिकला गंगाभेट करावी.

मातृगयाः—गुजराथ देशांत सिद्धपूर नावाचे क्षेत्र श्री सरस्वति नदीच्या काठीं आहे, आगगाडीचे स्टेशन सिद्धपूर नांवाचे आहे. स्टेशन व गांव यांत अंतर नाहीं सारखेच आहे. ती माहिती पुढें स्थल विशेषे देऊं.

स्वानुभवानुसार प्रवासाला निघण्यापूर्वीं आप्त इष्ट अगर इतर चांगली सोबत पाहून निघावें. कमींत कमी दोन सुज्ञ पुरुष आणि दोन जाणत्या स्त्रिया असून एखादा जाणता मुलगा अशीं पांचसहा माणसें जरूर असावींत. जास्त माणसे बरोबर असणें त्रासदायक प्रत्येकाची मनोवृत्ति व विचार निरनिराळे असतात त्यामुळें केव्हां केव्हां आपल्या इच्छे-विरुद्ध—भिडेस्तव दुसऱ्याच्या इच्छेप्रमाणे वागावें लागते. इतर कांहीं कारणामुळें ठिक-ठिकाणी आडयळेही येऊन प्रवासास उशीर लागून विनाकारण जास्त खर्च करावा लागतो.

वर लिहिल्याप्रमाणें पूर्ण यात्रा एकाच वेळीं करण्याला सुमारे चार महिनें लागतात.

श्री बद्रिनारायणाची यात्राः—स्वतंत्रपणें करावी. त्या यात्रेला सुमारे दीड महिन्यापासून तीन महिने लागतात. त्या यात्रेला वैशाखात आक्षय्य तृतिये नंतरच निघावे.

इतर तीर्थक्षेत्रे एकाच प्रवासांत करणें. इष्ट महाशिवरात्र झाली म्हणजे शक्य तितके लौकर निघावें. शिवरात्रीपूर्वीं निघणें इष्ट नाहीं. प्रवासांत थंडीचा त्रास आणि कपडयाचें ओझें होतें व खर्च जास्त लागतो. उन्हाळ्याचा त्रास फार कमी. थंडपाण्याची स्नानें करावीं लागतात त्यांस उन्हाळाच इष्ट. पांघरण्यास कपडे नको. ओझें कमी होतें.

## प्रवासांत बरोबर नेण्यास लागणारे सामानाचें टिपणः—

आंथरण्या पांघरण्यास रोजचे कपडे बेताचे व हलकेसे घेऊन स्वयंपाकासाठीं हलकी हलकी अशीं बेताची भांडी घ्यावीत. एक बादली व विहिरींतून पाणी काढण्यास लांब बारीक दोरी घेऊन शिवाय एक शिंकाळी आगत्य घ्यावीच. कपडयांची वळकटी बांध-ण्यास बारीक दोऱ्या अगर काथ्या असावा. ठिकठिकाणी कपडे वाळत घालण्यास ह्या दोऱ्यांचा फार उपयोग होतो. कंदील व लहान दिवा, चाकू, कातरी, सुया, दोरा, कागद शिसेपन्सिल घेऊन भिलावे, सुंठ, क्विनाइन, अमृतांजन, दालचिनीचा अर्क, बडिशोपेचा अर्क इत्यादि औषधी सामान असावें. काठ्या व छत्र्या न घेणें बरें त्या संभाळण्याचा व ठेवण्याचा त्रास होतो व कित्येकवेळा हरवतात.

फार महत्वाची गोष्ट म्हणजे प्रवासांत बरोबर पैसे नेण्याची असते. कोणी पैसे पुरेसे सर्व बरोबर घेतात. कोणी ठिकठिकाणी पोष्टाच्या मनीआर्डरनें मागवितात. हे दोनही प्रकार त्रासदायकच. पहिल्या प्रकारात प्रथम जास्त खर्च होऊन शेवटी शेवटी जरूर असलेला

खर्च करता येत नाहीं. शिवाय जवळ जोखीम बाळगल्यामुळें धोका होण्याची भीति, तशीच चोरीची भीति; दुसऱ्या प्रकारांत परक्या देशांत ओळख कोण देणार ? वेळेवर मनीआर्डर आली नाहीं तर जास्त मुक्काम करून विनाकरण खर्च जास्त होतो. ह्यासाठीं प्रथम मुंबई सोडण्यापूर्वीं येथील इंपिरियल बँकेत पैसे ठेऊन आपल्या प्रवासाच्या मार्गातील मोठमोठ्या शहरांतून आपणास लागतील त्या आदमासाच्या रकमाचे वेगळे वेगळे ड्राफ्ट घ्यावेत आणि परक्या देशांत आपणास ओळख मिळणार नाहीं म्हणून आपल्या सहीचा नमूना प्रत्येक ठिकाणी पाठविण्यासाठीं मुंबईच्या ऑफिसांतच सोय करून ठेवावी. हें सर्व करण्यास सुमारे दोन तास वेळ मुंबईच्या ऑफिसांत पैसे ठेवण्यास लागतो. आणि इतर शहरांच्या त्याच बँकेच्या ऑफिसांत प्रत्येक ठिकाणी अगदीं थोडा वेळ—फार फार तर अर्ध्या तासांत पैसे मिळतात. असे पैसे ठेवण्यास प्रत्येक ठिकाणच्या रकमांस शेकडा चार आणे मुंबई बँक आफिसांत अगाऊ द्यावे लागतात. कदाचित ड्राफ्ट हरवलाच तर ताबडतोब मुंबई आफीसला आणि ज्याठिकाणीं पैसे घेण्याचा ड्राफ्ट हरवला असेल त्या ठिकाणच्या बँक आफीसचे मुख्य अधिकाऱ्यास पत्रानें अगर तारेनें कळवावें म्हणजे आपले पैसे इतर कोणालाही मिळणार नाहींत अशी व्यवस्था बँक परभारे करून पूर्ण चौकशी अंती आपले पैसे आपणास मिळतात. ह्यापेक्षां जास्त माहिती पाहिजे असल्यास मुंबई इंम्पीरियल बँकेतून मिळवावी.

अलीकडे बहुतेक प्रत्येक रेल्वे कंपनीची गोल प्रवासांचीं तिकीटें मिळतात. मुंबई–बडोदा रेल्वेचे चार नंबरच्या प्रवासाचे एक तिकीट तीन महिने मुदतीचे सुमारे नव्वद रुपये किंमतीचे बरें असें मला वाटते. मी तसेच घेतले. प्रत्येकाने अगोदर पूर्ण चौकशी करून आपणास इष्ट व सोयस्कर असे एकच तिकीट काढून प्रवास करणें उत्तम. मध्यंतरी जवळपास कोठें जावेसें वाटल्यास तेवढया पुरती वेगळी तिकीटें काढता येतात. परंतु सर्व प्रवास वेळोवेळीं लागतील तशीं तिकीटें काढून करणे जास्त खर्चाचे व अतीशय त्रासाचे होते यांची कारणें:—आपल्याजवळ तिकीट असलें म्हणजे वाटेल त्यावेळी गाडीजवळ जातां येतें. बहुतेक ठिकाणचे तिकीटे देणारे त्रासदायक लोक असतात. अगदीं गाडी येण्याच्या गडबडींत—गर्दींत पैशांच्या मोड देण्याघेण्याच्या व कित्येकवेळीं गार्डींत जागा नाहीं म्हणून नानातऱ्हेच्या भानगडी उपस्थित होतात. त्यासर्व प्रथमपासून सर्व प्रवासाच्या एका तिकीटानें टळतात.

लेखाङ्क् १ समाप्त

# श्रीसाईसच्चरित

अध्यात्मिक निरीक्षण

## अध्याय ५ वा.

लेखक— सुमनसुंदर.

' पुढें कांहीं कालपर्यंत । बाबा होते जाहले गुप्त ।
मुसलमानांचे वऱ्हाडांत । आढळलें शिरडींत हें रत्न ॥ ५–३

' हे बाल फकीर गाडींतून उतरले । प्रथम भगताचे दृष्टीस पडले ॥
' या साई ' म्हणून सामोरें गेले । नाम तें पडलें तेथून ॥ ५–२९

गताध्यायीं सोळाव्या वर्षी प्रथम प्रकटून बाबा कांहीं काल गुप्त कां झाले ?

बाबा सोळा वर्षांचेच वयांत प्रथम प्रकटले याचा अध्यात्मिक दृष्ट्या 'बाबा त्यावेळीं लिंगदेही बनले ' असा अर्थ आपण गेल्या अध्यायांत काढला पण हा लिंग देह जरी जीवात्म्याला बंधन करणारा पहिलाच देह असला तरी तो दृग्गोचर नाहीं. तो सूक्ष्म मनोमय आहे. व पंचमहाभूतांचा आधार घेतल्याशिवाय त्याला स्थूल=देह म्हणजे नयन गोचर स्वरूप प्राप्त होत नाहीं. म्हणूनच लिंग देहाचे स्थूल देहांत रूपांतर होतांना जे काळाचें संक्रमण होतें तेंच श्रीबाबांनीं गुप्तावस्थेंत व्यतीत केलें आहे. बाबा प्रथम जे शिरडींत दिसलें तें लिंगदेहधारी नामरूप रहित होते. व आतां प्रकट झाले ते स्थूल देहधारी नामरूपयुक्त

असे झाले, व नंतरच त्यांनी अवतार कार्यास सुरवात केली. पहिल्या खेपेस त्यांना कोण-तेही नांव दिलें गेलें नव्हतें, फक्त 'पोर' असें संबोधिले होते. कारण जरी त्यावेळीं तें स्थूल भासले तरी त्यांनीं लिंगदेहावस्था धारण केली होती; तत्त्वतः ते सूक्ष्म होतें, आतां त्यांना 'साई' नांव पडलें; पण

'साई साई म्हणती जे जन। ते तरी काय नामाभिधान॥' ५—२५

'साई' हे तरी काय त्यांचे स्वतःचे नांव आहे? स्वतः परब्रह्मरूप असल्यामुळे ते तर नामरूपातीत आहेत! पण प्रथम

भगताचे दृष्टिस पडले। 'या साई' म्हणून सामोरे गेलें।
नाम तें पडले तेथून॥" ५–२९

भक्त झाला तेव्हांच देवाला देवपण आले. देव जरी भक्ताहून श्रेष्ठ व पुरातन असला तरी भक्ताखेरीज त्याला 'देव'—नांव मिळत नाहीं, म्हणून त्या दृष्टीनें भक्त देवाच्या आधींचा ठरतो.

'म्हाळसा पतीचिया खळीयासीं। आरंभी बाबा वऱ्हाडानिशी।
उतरल्या दिवशीं हें (नाम) पडलें॥ ५–२६

भक्ताला देव—गुरु—कसा दिसतो? तर गताध्यायीं दाखविल्याप्रमाणें स + आई=निर्गुण परब्रह्माचे सगुण प्रतिक असाच व म्हणूनच भगत

'या साई म्हणून सामोरे गेले। नाम तें पडलें तेथून'॥ ५—२९
'औरंगाबाद जिल्ह्यांतील। धूप खेडें गांवामधील
चांद पाटीलावरी केला अनुग्रह। लीला विग्रह धारकें या॥

अ. ५. ओ. ६ ते १८

आतां ही चांद पाटलाची कथा जशी आपण एखाद्या लहान मुलाला सांगूं तशीच प्रथम येथें उतरूं:—

औरंगाबाद जिल्ह्यांत धूप म्हणून एक खेडे गांव आहे. तेथें चांद पाटील नांवाच्या इसम त्या गांवचा अधिकारी होता, त्याच्यापाशीं एक घोडी होती. एकदां घोडीवर खोगीर घालून तिच्यावर बसून तो औरंगाबाद शहरची सहल करणेस गेला. तेथें घोडी-वरून उतरून त्यानें खोगीर काढून घेतले व घोडीला चरायला सोडून देऊन तो खोगीर घेऊन शहरांत गेला. तेव्हां त्याची नजर घोडीवर राहिली नाहीं. शहरांतील सर्व कामें उरकून तो परत घोडी सोडली होती तेथें आला. पहातो तो घोडी जाग्यावर नाहीं. त्यानें पुष्कळ शोध केला, पण घोडी कांहीं सांपडेना, तेव्हां तो निराश झाला व खोगीर पाठीवर

घेऊन त्यानें घरचा रस्ता सुधारला. वाटेत एका आंब्याच्या झाडाखालीं त्याला एक फकीर दिसला, त्या फकीरानें त्याला हांक मारली व म्हणाला "तूं फार दमलाभागलेला आहेस तेव्हां येथें बसून जरा विश्रांति घे. चिलीम पिऊन ताजातवाना हो. मग पुढें जा नाहींतर वाटेतच चक्कर येऊन पडशील." हें त्या पाटलाला पटले व तो तेथें बसला. इतक्यांत त्या फकिराचें लक्ष खोगीरावर गेलें. तेव्हां त्यानें पाटलास विचारलें 'हे खोगीर कसले' पाटील म्हणाला 'घोडी हरवली' व पाटलानें त्या फकिराला घोडीची हकिकत सांगितली. त्यावर फकीर हंसला व म्हणाला 'तुझी घोडी त्या शेजारच्या शेतांत नाल्यापाशी आहे. जरा जाऊन पहा!' हें ऐकून पाटील चकित झाला. पण त्या फकिराच्या शब्दावर विश्वास ठेऊन त्यानें त्या दिशेनें शोध केला. व आश्चर्य हें कीं त्याला घोडी लगेच सांपडली. तेव्हां पाटीलाचीं अशी भावना झाली कीं, 'हा फकीर म्हणजे अवलिया आहे' तो त्याच्याजवळ घोडी घेऊन आला. मग फकीरानें चिलीम भरली. पण विस्तव नव्हता. त्यानें जमीनींत चिमटा खुपसून जळजळीत निखारा काढला. चिलमीचा फडका भिजविण्यास पाणी नव्हतें. त्यानें हातांतलि सटका जमिनीवर आपटला. तो जमिनीतून पाणी निघूं लागलें. नंतर त्यानें चिलीम पेटवून आपण ओढली व पाटलाला पाजली. पाटीलाची मति त्या सर्व प्रकारामुळें गुंग झाली. त्यानें त्या फकिरास आपल्या घरीं बोलाविलें. व फकीर त्याच्या घरी गेला. पुढें त्याच्या भाच्याच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर तो शिरडीस आला. लग्न होऊन वऱ्हाड परतले, तरी तो फकीर शिरडींतच राहिला, व तेथेंच साईबाबा म्हणून प्रसिद्धीस आला."

वाचक म्हणतील अशी ही पाल्हाळीक गोष्ट सांगण्याची काय आवश्यकता? पण गुरुमाउलीला पान्हा फोडावयाचा तर बालवृत्तिच स्वीकारली पाहिजे. तरच तिला पान्हा फुटेल व ती आपल्याला ज्ञानदुग्ध पाजील! असो. तेव्हां अशी बालवृत्ति स्वीकारून आपण गुरुमाउलीला पान्हा तर फोडला. आतां ती काय ज्ञानदुग्ध देते तें पाहूं:—

'हा चांदपाटील कारभारी। धूपखेड्याचा ग्रामाधिकारी' ॥ ५-२०

'चांद' म्हणजे चंद्र. चंद्र हा कलात्मक असतो. मनही असेंच कलात्मक असते म्हणून आपण चांदपाटीलाला 'मन म्हणूं मनच सर्व देहेंद्रियांवर पाटीलकी करते व त्यांचा कारभार बघते आतां हा मन—पाटील कोठला? तर धूप खेडेगांवचा! खेडेगांव म्हणजे निसर्गः त्यांत आणखी 'धूप' म्हणजे विशुद्ध तेव्हां हा मन पाटील विशुद्ध अशा निसर्गाचा पाटील होता. म्हणजे त्या विशुद्धावस्थेंत त्याला जीवात्म्याची जाणीव होती. व त्याच्यावर बसून त्याच्या तंत्रानें चालून—तो जात असे अर्थात् जीवात्मा

हीच त्या मन—पाटीलाची घोडी ! येथपर्यंत सर्व ठीक झालें. पण पुढें त्या मन पाटीलाला और—अंग—आबाद ( और—मोहक, अंग—रूप, आबाद=लयलूट ) शहरची सहल करणेची लहर येते: हें औरंगाबाद शहर कोण ? तर मोहक मायाजाल—इंद्रियें व विषय यांचा बाजार ! म्हणजे मन विषयांकडे ओढलें जातें ! येथपर्यंत त्याला जीवात्म्याची जाणीव असते: घोडी जवळ असते: पण पुढें तो ( मन—पाटील ) या मायामोहांत गुरफटला कीं जीवात्म्याची जाणीव तो विसरतो: घोडी दृष्टिआड होते: व फक्त स्मृतिरूप—खोगीर त्याचे जवळ असते; पण जसें आपण बाजारांत गेलों व छत्री आपल्या बरोबर असली तरी आपणांस तिची स्मृति नित्य असते असें नाहीं; तसेंच हें जीवात्म्याचें खोगिर रूपस्मृति जवळ असतां सुद्धां या माया बाजारांत भटकतांना मनाला तिचा विसर पडतो; मन स्वच्छंद विषयरत होतें. कालांतरानें शहरची हौस फिटली, मायेचा वीट आला कीं मन परत घरीं विशुद्धावस्थेंत जाणेचा विचार करते. कीं लगेच त्याला खोगीर—स्मृति होते. ही स्मृति झाली कीं तो मनपाटील आपली घोडी—जीवात्मा शोधूं लागतो. पण वासनारूपी रानांत ती जी दृष्टिआड झालेली असते ती मिळत नाहीं. तो वैतागतो. वैताग ही वैराग्याची पहिली अवस्था ! पण वैताग तामसी असतो व वैराग्य हें सात्वीक असतें. हा दोहोंत मोठा फरक आहे. वैतागानें मनुष्य उन्मत्त होतो व आड मार्गांत जाणेचा संभव असतो. इतकेंच नव्हे तर आत्महत्येसारखें अघोर कर्महि करण्यास तो प्रवृत्त होतो. पण वैराग्याचें तसें नाहीं. वैराग्य त्याला आत्मोन्नतीच्या मार्गास लावते. असो. तो मनपाटील वैतागतो खरा पण त्याच्या पाठीवरचे खोगीर त्याला स्मृति देते. व एकीकडे वैतागानें निराश झालेला व दुसरीकडे स्मृतिरूप खोगीरानें आशिक अशा अवस्थेंत तो परत घरचा रस्ता सुधारतो. अर्थात् घोडी गेल्यामुळें व घोडीचें खोगीर पाठीवर बसल्यामुळें त्याचा परत—मार्ग श्रमाचा होतो. वाटेंत त्याला मूर्तिमंत शांति—सबूरी भेटते. ती शांति कशी ? तर आम्रवृक्ष नितांत रम्य अशा शीतळ छायेनें ताप हरण करणारा व सुमधुर फळांनीं मनस्ताप शांत करणारा ! त्याच्या तळाशीं कोण ? तर मूर्तिमंत शांति ब्रह्माचा पुतळा. असो.

**‘ डोईस टोपी अंगांत कफनी । ’** ५–१०

घातलेला फकीर, व तो काय करीत होता तर

**‘ तमाखू चुरुनी । तयारी केली चिलीम भरूनी । ’** ५–१०

चिलीम म्हणजे मनःशांतीचे साधन—उद्वेगावस्थेंत मनाला शांत करणारे व शांत अवस्थेंत रमविणारे साधन ( बहुतेक धूम्रपानी लोक विषण्णावस्थेंत व रिकामटेकड्या वेळांतच

जास्त धूम्रपान करतात.) अशी ही त्रि-मूर्तावस्थेंत त्या मनपाटलाला काय शांति भेटली. ती शांति त्या श्रांत मनपाटलाला काय शांति–मंत्र सांगते ? तर

" येरे चिलीम पिऊन जा पुढतां। छाये खालता बैस जरा "

तूं श्रांत आहेस. तेव्हां जरा शांत हो. सबूरी धर. आपल्याला पुढें जावयाचेंच आहे. पण तकवा तर पाहिजे ना! नाहींतर राम भेटण्या आधीच वाटेंत राम म्हणावयाचास! तेव्हां सबूरी धर शांत हो. छायेंत बसून देह शांत कर व चिलीस पिऊन मन शांत कर. असा अंतर्बाह्य शांत हो! मन शांत–स्थिर–झालें कीं आपोआप पुढील मार्ग दिसतो. आत्मनिष्ठा वाढते. येथें ही आत्मनिष्ठा फकीराच्याच मुखी बसून मार्ग दाखवीत आहे. कारण भक्तिमार्गांत आत्मनिष्ठेचे प्रतीक गुरुच असतो. व बाबांचा अभिप्रेत मार्ग भक्तिमार्गच आहे. तेव्हां आपण त्या फकीराला शांतिब्रह्माच्या पुतळ्याला गुरुच म्हणूं. हा गुरु भेटला. त्यानें कसा मार्ग दाखविला ? तर सबूरी व निष्ठा ह्यांनीं त्याचें मन प्रथम शांत केले. मग त्याला आत्मनात्मविवेक सांगितला. तो कसा ? तर त्यालाच विचारलें कीं, 'हें खोगीर कसलें ?' बा मना तूं एवढा श्रांत कां एवढी कशाची स्मृति तुला बेचैन करिते आहे ?" मग मन पाटील उत्तर देतो 'जी घोडें हरवलें. माझा जीवात्मा मला मिळत नाहीं !' मग गुरु त्याला बोध करतो कीं

'जा शोध ते बाळे।' तुझें आहे तुजपाशीं परि तूं जागा चुकलासी'
'पाहि पाहि डोळेभरी॥' नीट शोध कर।

आत्मनात्मविवेक–नाळा–कर कीं घोडें सांपडेल जीवात्मा तुला भेटेल !' असा आत्मानात्मविवेक करून जीवात्मा '-मी-' शोधला कीं मनाला कळतें कीं मीच जीवात्मा आहें. मी मन व घोडे जीवात्मा दोन नाहींत. 'घोडे सापडलें तात्काळ॥ ५–१२

"चांद पाटील विस्मित झाला। मनीं म्हणे हा अवलिया भेटला॥
पार नाहीं सामर्थ्याला। मानव ह्याला म्हणूं नये॥ ५·१३

येथपर्यंत मनाला व्यतिरेकानें 'पिंडींचें तत्व'–मीच जीवात्मा–हें कळलें. पण तेवढ्यानें आतां त्याचें समाधान होत नाहीं. कारण मी मन जीवात्मा व पटवून देणारा अवलिया गुरु परमात्मा हें द्वैत निर्माण होतें. व जोपर्यंत द्वैत आहे तोपर्यंत दुजाभाव असणारच. मग मनाला शांतिब्रह्म कसें लाभणार ? तेव्हां सहजांत त्याला 'हा गुरुपरमात्मा कोण ? हें ब्रह्मांडीचें तत्व काय आहे ? हें जाणून घेणेची इच्छा मुमुक्षा –होते. म्हणजे तो–मनपाटील–आतां अन्वयानें परमात्मस्वरूप होणेच्या मार्गाला लागला. ही त्याची मुमुक्षा गुरु प्रथम तीव्र करतो.

'फकीर पासी बैसवी त्याला । ५·१४

ती कशी ? तर अघटित करणी करून–

'चिमटा उचलला स्वहस्तें ॥ १४ मग तो तेथेंच मातींत खुपसला ।
आंतून प्रदीप्त निखारा काढला । हातांतील चिलमीवर ठेविला ॥ १५
पुढे छ र्ती भिजवावयास । पाणी नाहीं जवळ पास ।
सटका आपटी जमिनीस पाणी निघायास लागलें ॥ १६"

अशी अघटित करणी करून तो त्या मनपाटीलाला पटवून देतो कीं 'नर करणी करेसे नारा ण हो जाय !' "भावना म्हणजे संकल्प. त्या भावनेचे प्रकार दोन. एक सिद्ध भावना व दुसरी असिद्ध भावना. ज्या भावनेंत तिच्या विरुद्ध विकल्पाचा मुळींच प्रवेश होत नाहीं-मन आपल्या एका ध्येयावरून मुळींच प्रचलित होत नाहीं. तिला सिद्ध भावना म्हणतात.ब्रह्मदेवाच्या भावनेमुळें हें जगचित्र निर्माण झालें आहे. आणि ते सर्व जीवांच्या भावनांच्या दृढपणामुळेंच सत्यत्व पावलें आहे. ब्रह्मदेवाच्या जगताप्रमाणें आपल्या संकल्पजन्य जगतासंबंधीं कोणाचीच सत्यत्वाची भावना नाहीं. आणि ह्याच विकल्प मनांत प्रवेश करीत असल्यामुळें आपली भावना असिद्ध रहाते." (श्रीदत्तभार्गव संवाद. प्र. १४) मग तो गुरु त्याला 'तत्वमसि' 'सोहं' इत्यादि महावाक्याचा बोध करून 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' हें त्याला सांगतो.

'स्वयें त्याला तयाही पाजिली । मति गुंगली पाटलाची ॥" ५·१७

पण 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' एवढें कळून मोक्ष मिळत नाहीं. कारण हें सविकल्प–परोक्ष-ज्ञान झालें. व स्वानुभव अपरोक्ष-ज्ञान झाल्याखेरीज मोक्ष मिळत नाहीं. तेव्हां हा महावाक्याचा बोध झाल्यावर मनपाटीलाला त्याचा अनुभव मिळविण्याची ओढ लागते.

'पडिला फकीरास आग्रह । पवित्र करा हो माझें गृह ।' ५. १८.

तो गुरुपाशीं 'मला पावन करा, मला आत्मानुभव द्या' असें अनन्यभावें शरण जाऊन सांगतो. व मग गुरु त्याच्या मस्तकीं वरदहस्त ठेऊन त्याचें अज्ञानपटल दूर करून त्याला जीवन्मुक्त करतो.

'पाटिलावरी केला अनुग्रह । लीलाविग्रह धारकें या ॥' ५. १८.

ज्या संतांची अनुग्रह देऊन शिष्य करण्याची प्रथा असते ते अशा अनुग्रहित शिष्यांकडेच अन्नसेवन करतात. त्याचा भावार्थ हाच कीं शिष्य अनुग्रहित झाला कीं गुरु शिष्य हा दुजाभाव जाऊन तेथें एकभाव उत्पन्न होतो. व हेंच श्रीबाबांनीं

'दुसरें दिवशीं गावांत गेले। पाटीलाच्या येथें उतरले। कांहीं काळ तेथेंच राहिले। पुढें ते परतले शिरडीस ॥ ५. १९.

ह्यांत दिग्दर्शित केलें आहे. असे गुरु अनुग्रहित शिष्यांच्या व्यवहारांत सुद्धां आपुलकीनें भाग घेतात. त्यांना शिष्यांचें कार्य ( व्यवहार ) आपलेंच आहे असें वाटतें व ते त्यांत जातीनें लक्ष घालतात व ते घडवून आणतात.

'त्या चांदभाईचे ओढीं। बाबाही वऱ्हाडीं प्रविष्ट ॥' ५. ५२.

शिष्याचा कार्यभाग झाला; 'लग्न झालें वऱ्हाड परतलें' कीं मग गुरु आपला मार्ग स्वीकारतो.

'बाबा एकटेच मागें राहिले। राहिले ते राहून गेले। भाग्य उदेलें शिरडीचें। ५. २३.

भक्तिमार्गास्तव बाबांनीं द्वैताचें रूपकच अखेरपर्यंत ह्या कथेंत ठेविल्यामुळें वरील समारोपही द्वैतपरच करावा लागला. ह्याचा केवळ ज्ञानपर परिभाषेंत भावार्थ सांगावयाचा म्हणजेः—

पिंडी तें ब्रह्मांडीं हें तत्त्व जीवात्म्यास अनुभवास येऊन तो जीवन्मुक्त झाला कीं परमात्मा गुरु हा त्याच्या समवेतच असतो व जीवात्मा प्रारब्धानुरूप देही अवस्था भोगीपर्यंत तो त्याच्या बरोबर असतो. किंबहुना त्याचे सर्व व्यवहार तो स्वतःच करतो व शेवटीं जीवात्म्याचें प्रारब्ध संपलें कीं त्याला आपल्यांत समरस करून घेऊन एकमेव परमात्मा मागें रहातो.

'बाबा एकटेच मागें राहिले ॥' ५ २३.

म्हणजे या कथेंत बाबांनीं 'पिंडीं तें ब्रह्मांडीं' हे तत्त्व उलगडून आपण मुळांत अच्युत असतां च्युत झालों व पुनः अच्युत कसें व्हावयाचें हें उद्बोधिलें आहे. आपण अच्युत खरे पण आपण मूळांत च्युत कसे झालों ? विश्वाची उत्पत्ति कशी झाली ? अशी जिज्ञासा येथें उत्पन्न होते व तिचें निरसन श्रीबाबांनींच पुढील कथेंत केलें आहे.

'उघड्या जागीं उठविला बाग। ' ५. ५१.

कथासार [ ओळी ३७ ते ५२ ] 'स्वतःच्या हातांनीं प्रत्यही दोन नव्या कच्च्या घड्यांनीं पाणी घालून बाबांनी उघड्या जागेवर बाग उठविली. ह्या बागेंतील लागवण बाबांनीं स्वतः केली. अखेर त्याच ठिकाणीं साठ्यांचा वाडा झाला व तेथेंच, श्रींच्या पादुकांची स्थापना झाली,

'एकाकीं न रमते ' ही श्रुती । ' बहुस्याम् ' ऐशियां प्रीतीं ॥
आवडूं लागे दुजियाची संगती । पुनरपी मिळती एकत्त्वीं ॥ , १. ६८.

' चैतन्यनाथ परमात्मा अपरिमित समर्थ असल्यामुळें त्याची सृष्टी त्याच्या स्वस्वरूपांतच प्रकट होते. चैतन्यावांचून जगताला अस्तित्व नाहीं.

श्री. द. भा. स. म. ११.

मूळ अद्वैत परब्रह्म स्थितींच सर्वत्र एकत्त्वाचीच असल्यामुळें सर्व उजाड होते. ( दृश्य, द्रष्टा, भेद नव्हता म्हणून उजाड म्हणावयाचें ! ) तेथें कांहींच दृश्यमान नव्हतें. पुढें ' बहुस्याम् ' असें त्या अद्वैत परब्रह्माला स्फुरण झालें. ' हें एकरूप असणारे चैतन्यच आपल्या स्वातंत्र्याच्या योगानें आपलेंच स्वरूप बाहेर करून दाखवितें. हीच पाहिली उत्पत्ति. हिलाच अविद्या म्हणतात. '

श्री. द. भा. सं. प्र. १४.

या स्फुरणामुळें माया द्वैत भासमान झालें. त्यानें मातीचे 'दोन घडे' घेतले. ते घडे कसे ? तर एक ' कच्चे ' म्हणजे ' आभासरूप '; म्हणूनच त्यांना ' माया ' म्हणजे ' जी नाहीं ती ' म्हणतात, व दुसरें

' ठेवण्याचाच अवकाश तेथ । जागचे जागींच भंगून जात ॥' ५. ४९

म्हणजे माया जड चैतन्यरहित भासली तरी ती चैतन्यावरच अधिष्ठित आहे. तें चैतन्य काढून घेतले—घडे खालीं ठेवले, बाबांच्या हातचें चैतन्य काढून घेतले—कीं मायेचा निरास होतो–घडे भंगून जात. तेव्हां चैतन्यरूप बाबांनीं आभासरूप घड्यांनीं संकल्परूप जीवन घालून मूळ अद्वैताच्या उघड्या जागीं द्वैतरूप मायाबाग निर्माण केला व प्रत्यहीं नवे घडे—नवीन आभास—घेऊन जाई, जुई, झेंडू इ. मनोमय संकल्प करून मायाबाग नटविली. त्याचा संकल्प सिद्ध झाला. सृष्टिउत्पत्तिच्या प्रथम पुरुष प्रकृति युक्त कारणदेह, अठरा तत्त्वांचा लिंगदेह व मग पंचवीस तत्त्वांचा स्थूलदेह ( गताध्यायांतील ब्रह्मांडाचा वंशवृक्ष पहा. ) अशा तीन अवस्था होतात. व बाबांनीं

' तीन वर्षें हाच उद्योग । उघड्या जागीं उठविला बाग ' ॥ ५. ५१.

ह्यांत ह्याच अवस्था गर्भित केल्या आहेत. अशी चराचर सृष्टी निर्माण झाल्यावर परमात्मा आपले संकल्प सोडून देतो व स्वस्थ मजा पहात बसतो. मजा कशाची तर त्यानेंच स्वसंकल्पानें जे जीवांश–झाडें–मायेंत गोविलें त्यांची होतां होतां जेव्हां तो पाहातो कीं, ' हे जीवांश मायामूढ बनून मायामय बनले—निर्बुद्ध झाले. त्यांचा मीपणा

जाऊन ते वाड्याचा—मायेचा—उपभोग घेऊं लागले.' तेव्हां त्याला पश्चात्ताप होतो· व त्या मूढ जीवात्म्यांना त्यांच्या वास्तव स्वरूपाची जाणीव देऊन त्यांना मुक्त करण्यासाठीं—स्वस्वरूपांत मिळवून घेण्यासाठीं—तो त्यांना सुलभ असा भक्तिमार्ग दाखवितो.

**'स्वामींच्या पादुका । पूजा कामुकां स्थापिल्या ॥ '५. ५२.**

एथें मजा ही आहे कीं, बाग केला बाबांनीं, वाडा बांधविला बाबांनी आणि स्वामी कडून साईभक्तास दृष्टांत रूपानें

**'शिरडीस सांप्रत मम स्थान '** ५–५६

असा आदेश देऊन पादुका स्थापिल्या अक्कलकोटच्या स्वामींच्या ! म्हणजे येथें बाबांनीं आपण च्युत कसें झालों व पुनः अच्युत व्हावयास संतसंगाची किती आवश्यकता आहे व संतमालिका कशी एकसूत्र असते हें दाखविलें. बाबांनी प्रस्तुत अध्यायांत श्री अक्कलकोट स्वामीविषयीं व इतरत्र इतर संत मालिकेंतील विभूतिविषयीं दाखविलेला आदर आणि प्रस्तुत अध्यायांत श्री गंगागीर—आनंदनाथ आदि संतांनी व इतरत्र ' सच्चरितांत व इतर ग्रंथांत इतर संतांनी श्रीबाबाविषयीं दाखविलेला आदर यांनीं संत मालिका अनन्यत्त्वें एकसूत्र कशी असते हें चांगलेच विशद केलें आहे. व आपण साधकांनीं ह्याकडे दुर्लक्ष करून भागायचें नाहीं. आपली एक निष्ठता होण्यासाठीं जरी बाबांनी

**' येवो म्हणती प्रसंग कांहिं । ' आपना तकिया छोडना नाहीं ' ।**
**सदा सर्वदा निश्चल राही ॥** २६–५५

असा तात्कालिक दंडक घातला असला तरी त्याच ओवींत पुढें

**' अनन्य पाही एकत्त्वें । '**

ही मेखही मारली आहे. व स्वतःच ती सोडवून दाखविली आहे. त्याचे सविस्तर विवरण यथासंदर्भ होईलच असो.

आपण अच्युत असून च्युत झालों. व ते कसे झालों एवढे जरी कळले तरी तेवढ्यानें सर्व आशंका फिटत नाहीं, कारण ' कां झालो ' ही आशंका रहातेच ! 'पिंडी ते ब्रह्मांडी, ' ' जीवात्मा तोच शिवात्मा ' हे कळले तरी पिंड व ब्रह्मांड, जीव व शिव हा भेद कां भासतो त्याचें निरसन झाल्याखेरीज एकतत्त्व अनुभविण्यासाठीं आपणांस साधन करतां येणार नाहीं.

' मी तूं ' इत्यादि भेदभाव मूळ निर्माण कशामुळें होतात ? तर ' मी ' मध्यें ' ल्हान ' ' मोठा ' असा कांहिं विशिष्ट ' आपण ' आल्यामुळें ! म्हणजे हा ' आपण ' च

भेदाला मूळ कारण होय! व ह्या 'आपण' लाच 'अहंकार' म्हणतात. हा अहंकार दोन प्रकारचा असतो:—

१ देहाहंकार—म्हणजे 'माझें माझें' म्हटल्या जाणाऱ्या गोष्टीवर 'मी' त्वचा आरोप करणे ह्यांत 'मी' ला 'मोठा' असा 'आपण' असतो हा तामसी असतो, ह्यालाच 'गर्व' म्हणतात; व हा मुदलीच भ्रामक असल्यामुळें जीवात्म्याला ह्याच बंधनांत पाडतो.

२ सात्विक अहंकार:—म्हणजे जें कांहीं परमात्मतत्व आहे ते 'मी'च आहे असा स्वतःवरच अध्यारोप करणें 'सोऽहं' 'तत्त्वमसि इत्यादि महावाक्यांत ह्याच भरलेला आहे. ह्यांत 'मी' ला 'लहान' असा 'आपण' असतो. त्यामुळें हा मोक्षानुकूल कर्मे करणेंस प्रवृत्त करतो! अतएव हा सात्विक आहे व ह्यामुळेंच जीवात्मा मुक्त होतो.

व ह्यांत अहंकार द्वयांचें दिग्दर्शन आतां आपणांस करणें आहे.

**केश माथ्याचे सबंध राखीत । डोके न कधी मुंडवीत ॥**
**पहिलवानासम पेहेराव करीत । तरुण वयांत हे साई ॥** ५–४५

देहाहंकारांत वृत्ति 'करीन ती पूर्व' अशी 'दादा' गिरीची असते व वरील पेहेरावावरून बाबांनीं तीच व्यतीत केली आहे. पण—? ही 'दादा' गिरी केवळ ऐहिक असते. कारण 'ग' चे घर खालीं" या न्यायाने व्यवहारांत 'शेराला सव्वाशेर' भेटतोच. देहाहंकाराचे सोंग [ पेहेराव ] घेतलेल्या बाबांना मोहिद्दीनभाई 'सव्वाशेर' भेटला त्याच्याशी बाबांनी कुस्ती मारली व

**" मोहिद्दीन होऊनि अबला । बाबा हतबळ जित झाले "** ॥ ५–६५

अशा रितीनें रंग जिरल्यावर देहाहंकार पार लयास गेला!

**' तेथून मग निश्चय केला । पोशाख अवघा बाबांनी बदलला ॥ "** ५–६६

असें झाले कीं, वृत्ति उलट खाते. हा देहाहंकार कांहीं अक्षय नाहीं. तेव्हां तो कामा येत नाहीं. हें त्याला कळून तो तो टाकून देण्याच्या मार्गाला लागतो. जन्मोजन्मीच्या वासनांनी ही देहाहंकाराची पुटें जीवात्म्यावर इतकीं दृढ झालेलीं असतात कीं तो टाकूं म्हणून तीं जात नाहींत. त्याकरितां कणखर हत्यारे [ साधन ] घेऊनच तीं काढून टाकावीं लागतात. ही हत्यारें कोठलीं ? तर साधन चतुष्टय

१ वैराग्यः—मार्मिक गोष्टांकडे दोषदृष्टी

'कफनी ओढली लंगोट लाविला । फडका गुंडाळिला माथ्यास ॥ ६६
केले गोणाचे वरासन । गोणाचेच अंथरूण ।
फाटकें तुटकें करोनि परिधान । त्यांताचि समाधान मानावें ॥" ६७

"खा, पी, चैन कर या इंद्रियांच्या प्रेरणा होत. आणि आत्म्याची प्रेरणा मोक्षानुकूल कर्में करण्यास सांगत असत्ये, पहिली प्रेरणा नुसत्या बाह्य म्हणजे कर्मसृष्टींतली आहे, आणि दुसरी आत्म्याची म्हणजे ब्रह्मसृष्टींतली आहे पैकीं संशयाच्या स्थळीं कर्म सृष्टीची प्रेरणा न स्वीकारतां शुद्ध आत्म्याच्या स्वतंत्र प्रेरणेप्रमाणें मनुष्य वागूं लागला, यालाच खरें आत्मज्ञान किंवा आत्मनिष्टता असें म्हणतात—म्हणजे तो जे व्यवहार करतो ते स्वभावतःच मोक्षानुकूल होऊन अखेर मूळांत स्वतंत्र शरीर आत्मा नित्य, शुद्ध, बुद्ध, निर्मल, व स्वतंत्र अशा परमात्म्यांत मिळून जातो. गीतारहस्य ॥ प्र. १०

"बहिर्मुख विषय भोगी । न होय तो विरागी ॥
मग योगी कैसा होईल ॥ जो अन्य गोडी न पाहतां ।
आहार मात्रे घे तृप्तता । त्याला ये योग्यता ॥
श्रीदत्तमहात्म्य ४७–५५–६

२ शमदमादिषट्कः—सर्व श्रेष्ठ परमेश्वराची जाणीव व तदनुरुप सात्वीक कर्मांकडे प्रवृत्ति.

'गरीबी अव्वल बादशाही । अमीरीसे लाख सवाई ॥
गरीबोंका अल्लाभाई ! अक्षयीं साई वदत कीं ॥ ५–६८

वैराग्य बाणणें म्हणजे आस्तिक्य बुद्धि उत्पन्न होऊन परमेश्वराला भिऊन कर्में करणेची वृत्ति बनणें.

३ मुमुक्षाः– 'मी' कोण हें जाणणेची इच्छा व तदनुरूप प्रयत्न.

शमदमनानें लीनता अंगीं बाणली तरी 'मी' आहे हा आभास होतच असतो. व त्याचें संशोधन करतांना त्याला कळतें कीं,

"देवा सर्वेच करीत केली । तनूही झिजविली पाहिजे ॥"

आत्मसंशोधन—अज्ञान निरसन म्हणजेच विवेक—तो देवापाशीं करीत करूं लागतो. म्हणजे 'मी' कोण व 'देव' कोण. 'मी' मोठा कीं, 'देव' मोठा. इत्यादि द्वैत उलगडण्याच्या मार्गास लागतो. त्याकरितां तो सूक्ष्म आत्मनिरीक्षण करतो. कारणापुरताच तो बाहेर जगाशीं संबंध ठेवतो.

असो पुढें साईनाथ। विचारल्याचेंच उत्तर देत।
स्वयें आपण कोणासमवेत। कधींही बोलत नसत ते ॥ ५·७२,

इकडे मौन स्वीकारून अंतःस्थैर्य राखावयाचे. पण जगांत

'बाबा दिवसा दुपारीं तिपारीं। स्वेच्छाचारी हिंडत ॥ ५·७५

मायिक गोष्टीचें सूक्ष्म अवलोकन करावयाचें. व साधु-जनांचा—कुत्सितांचा नव्हे—सहवास करून आपल्या ध्येयाला अनुकूल असे पाहून घ्यावयाचें.

'नलगे जरी कोणाची सांगात, तरी दिवसा भक्तपरिवाराक्रांत ॥' ५·८५

पण खरें आत्मसंशोधन कोठें व केव्हां करावयाचें? तर—

अस्तमानानंतर शिरडींत। पडक्या मशिदींत निजावें ॥ ५·८५

**मशीद**—जशी चावडी ही भक्तिमार्गाची प्रतीक तशीच मशीद ही ज्ञानमार्गाची प्रतीक बाबांनी केली आहे. ती मशीद कशी?

मशीद तरी ती केडती। अवघी जागा दोन खण ती।" ५·९५.

सविकल्प ज्ञान झालें तरी सांगीव असल्यामुळें अपुरेंच असतें. व द्वैतभाव युक्त असते. अपरोक्ष ज्ञान हे स्वानुभवपूर्ण व अद्वैतपर असतें. पण परोक्ष ज्ञान झाल्याखेरीज अपरोक्ष ज्ञान होत नाहीं. कारण अपरोक्षज्ञान निर्विकल्प असल्यामुळें त्यांत ज्ञान-अज्ञान हें द्वैतच असूं शकत नाहीं. ज्ञान (सविकल्प) व अज्ञान हे विकल्प आहेत. व म्हणून अज्ञान विकल्पाचा नाश सविकल्प—परोक्ष—ज्ञानानेंच होतो! असो,

शास्त्रकारांची अशी प्रथा आहे कीं सगुण ध्यानमूर्ति बनविणांनी आपल्या भावनेला अनुरुप असें रुप तिला द्यावयाचें व तेंच भावदिग्दर्शक अशीं आयुधें तिच्या हातांत द्यावयाचीं म्हणजे मूर्ति व आयुधें हीं रूपकात्मक असतात. बाबांचीही तीच प्रथा दिसून येते. प्रत्येक अध्यात्म--तत्त्वाला सगुणरूपक देऊन त्यांनीं आपलें अवतार-कार्य ठरविलें आहे. आतां वरील साधनेंच घ्या. हीं फक्त भावनिदर्शक आहेत. पण बाबांनी त्यांना मूर्तस्वरूपांत धारण केलें आहे. तें कसें?—

'चिलीम तमाकू टमरेल। अंगांत कफनी पायघोळ ॥
माथ्यास फडका धवल। सटका जवळ सर्वदा ॥ ५·८६'

आतां वरील साधनें ह्या वेषभूषेंत बाबांनी कशीं धारण केलीं आहेत तें पाहूं—

१ वैराग्यः—मायाविन्मुख.

'अंगांत कफनि पायघोळ। माथ्यास फडका धवलः—

श्री गजाननाच्या रूपकांत अंग हे माया निदर्शक व गजमुख हे ब्रह्म निदर्शक मानून गजमुखानें ब्रह्म हें मायेहून वेगळें आहे. तेंच रूपक येथें श्रीबाबानीं पर्यायानें घेतलें आहें. अंगांत मळकट पायघोळ कफनी घालून माया–व्यतीत केली आहे व माथ्यास धवल फडका गुंडाळून ब्रह्माची विशुद्धावस्था दिग्दर्शित केली आहे.

२ लीनता;—समदृष्टिः–( शमदमादि षट्काची परिणति )

' टमरेल ' : समदृष्टि झाली कीं चांगले वाईट याचा विधिनिषेद रहात नाहीं व टमरेलचा उपयोग पाणी पिण्यापासून भाजी आमटी घेण्यापासून, तेल आणण्यापासून तों तहत शौचमार्जनापर्यंत बाबा करीत. तेव्हां टमरेल हें समदृष्टिचें द्योतक सार्थ ठरते.

३ मुमुक्षा—दृढनिश्चयः—

' सटका जवळ सर्वदा ! '

ह्यानें मुमुक्षा दिग्दर्शित केली आहे. व सटक्याचा उपयोग बाबा दृढनिश्चयात्मक गोष्टीसाठींच करीत याचें वर्णन वेळोवेळीं आलेलेंच आहे.

' सटका आपटी जमिनीस ! पाणी निघायास लागलें ॥ ५—१६

अज्ञान निरसन सविकल्पज्ञानः—( विवेक )

चिलीम–तमाखुः—तमाखू=तम=अज्ञान+आखू=प्रतीकः म्हणजे अज्ञानाचे प्रतिकः हा तंबाखूरूपीं अज्ञान विकल्प सविकल्पज्ञानरूपीं निखाऱ्यानें बाबा जाळीत व त्या उभयतांच्या संयोगानें निघालेला आत्मज्ञानरूपीं विशुद्ध धूर पीतः म्हणजे ज्ञानमृत चाखीत.

ह्यावरून वेशभूषा बाबांनी किती अर्थपूर्ण नटविली होती तें विशुद्ध होते. जशी ही स्वतःची वेषभूषा त्यांनीं नटविली होती तसेंच मशिदींतही त्यांनीं तेंच रूपक ठेविले होते.

१–२ वैराग्य–व शमदमादिषट्क

' या वसनाचे आच्छादन । आठाठ दिन स्नान विहीन ॥
पायीं जोडा नावहाण । एक आसन गोणाचें "

' पोत्याचा तुकडा एक । तयावरी नित्य बैठक ॥
तक्या कसा तो नाहीं ठाऊक । अराणुक कैसेनी ॥ ८९

' तोंवरी तें जीर्णतरट । तींच त्यांची आवडती बैठक ॥

सदासर्वदा तैसीच निष्टंक । अष्टौप्रहर तें जागीं ॥
‘ तेंचि आसन वा आस्तरण । कासे एक कौपीन परिधान ॥
नाहीं दुजें वस्त्रप्रावरण । शीत निवारण एक धुनी ॥ ९१
“ मशीद तरी ती केडती । अवघी जागा दोन खणती ॥
त्यांतचि बसती, उठती, निजती । भेट देती समस्तां ॥ ९२

मुमुक्षा व विवेक

“ दक्षिणाभिमुख आसनस्थ । कठड्यावरी वामहस्त ॥
समोर धुनीकडे अवलोकित । बाबा मशिदींत बैसत ॥ ९२
“ ऐसिया त्या प्रखर कुंडा । लाविला ज्ञानाभिमानाचा ओंडा ॥ ”
“ अल्लामालिक सदैव तोंडा । तयाचा झेंडा अखंड ॥ ९४ ”

येथपर्यंत बाबांची वेषभूषा व मशिदीचा थाट याचें वर्णन झालें. फक्त एकच साधन राहिलें आहे तें नमूद करून पुढें चालूं.

५ भक्ति—‘ अल्लामालिक सदैव तोंडा, तयाचा झेंडा अखंड ’ वरील चार साधनें जरी आत्मज्ञान होणेस पुरेशीं असली तरी जर त्याला भक्तिची जोड मिळाली तर दुधांत साखर पडल्यासारखें होते. म्हणूनच बावांनी ‘ तयाचा ( भक्तिचा ) झेंडा अखंड । ’ ठेविला कारण भ्रमनिरसनाला भक्ति इतकी—सुलभ चीज दुसरी नाहीं
“ मावळला भ्रम राम गुण गातां । उपासना आतां सोडूं नये ॥ ”(श्रीरामदास)

साधकाच्या देहाहंकार निरसनानंतर तो वरील पांच साधनें घेऊन मोक्षाच्या मार्गाला लागतो खरा ! पण साधनें करीत आहे तोंपर्यंत तो साधकच आहे. सिद्ध नाहीं ! या साधनांच्या परिपूर्तिनंतर सिद्धावस्था प्राप्त होण्याला मधें एक पायरी अजून शिल्लक रहातेच. ती कोणती ?

‘ कुस्तीनंतर पांचवे वर्षीं । फकीर अहंमदनगर निवासी ॥
जव्हार अलीनाम जयासी । आला रहात्यासी सशिष्य ॥ ” ५–११६

कुस्तीनंतर—देहाहंकार निरसनानंतर—पांचवे वर्षीं—वरील पांच साधनें तयार झाल्यावर अहंमदनगर निवासी अहं+मदन+गर ( असा श्रीउपासनींनी त्याचा विग्रह श्रीउपासनी लीलामृतांत केलेला आहे ) म्हणजे ‘ मी ’ रूपीं मदन त्यानें युक्त असें विष त्यांत निवासी अतएव ‘ अहंकार ’ रहात्यासीं—साधकरूपीं मनांत—आला. तो कोण ? तर जव्हारअली नाम जयासी—ज्याला नेहमीं साधकाला सिद्ध होणें करितां ‘ सुस्सरबाई तुझी पाठ मऊ । ने

एकदां पैलतीरा " जोहारअली—तूंच परमेश्वर म्हणून नमावें—जोहार करावा—लागलें; तो म्हणजेच सात्वीक अहंकार ! तो अहंकार कसा ? तर

" फकीर होता मोठा पढीक । कुराण शरीफ करतलामलक ॥ "

५—१२०

तो अहंकार म्हणजेच ' सोऽहं ' ' हंसः ' ' तत्त्वमसि ' इत्यादि महावाक्याचे मूर्तिमंत स्थान व सर्व शास्त्रांचा तेथूनच उगम होतो. त्याच्या पोटींच सर्व शास्त्रें सामावतात. व अखेर सर्व शास्त्रें त्याच्यांतच लय पावतात. म्हणून सर्व शास्त्रें त्याला अवगत असतात इतकेंच नव्हें तर तो त्यांना क्षुल्लक—करतलामलक—हातचा मळ समजतो. असो.

'—तो शिरडीस आला । मशिदींत राहिला बाबांपाशीं ॥ "५—१२२

वर आपण ह्या वेळची बाबांची अवस्था कशी होती ती पाहिली आहेच. ते पंच साधनयुक्त साधकावस्थेंत होते. जीवात्मा तत्त्वतः मुक्त असला तरी त्याच्यावरच बांधला गेल्याचा अध्यारोप करतातः व येथें बाबांनीं तोच आरोप बाह्यत. ग्राह्य धरून स्वतःला साधक—जीवात्मा भाविलें आहें. वरील साधनांची परिपूर्तता होत आली कीं साधकाला गुरुकडून किंवा आत्मसंशोधनांत ' तत्त्वमसि, इत्यादि महावाक्याची धारणा होते. ' राहिला बाबांपाशीं । ' व तो त्याचेंच ध्यान करण्यांत रत होतो.

" बाबांसही कांहिं केली करणी । घातली मोहनी जन म्हणती ॥ "

५—१२३

भक्तिमार्गांत जी गुरुची योग्यता तीच ध्यान—ज्ञान—मार्गांत ध्येयाची ! म्हणजे तत्त्वतः ध्येय आणि गुरु एकच ! व ही भावना रोमरोमीं बाणेल तेव्हांच आपण मुक्त होऊं ! अर्थात् जीवात्मा ' तत्त्वमसि ' च्या ध्यानांत रत झाला कीं ओघानेंच तो सात्त्वीक अहंकाराचा शिष्य बनला.

" बाबांसारिखा शिष्य सधरू । जव्हारअली झाले गुरू ॥ "

" मग दोघांचा जाहला विचारू । रहिवास करूं रहात्यांत ॥ "

गुरू व शिष्य हे द्वैत सुरूं झालें. पण शिरडीं तर परब्रह्माचें—अद्वैताचें— माहेरघर ! मग तेथें द्वैत कसें संभवणार ? पण मुळांत अद्वैतांतूनच द्वैत भासमान होतें हें शिरडींतच गुरुशिष्ययोग आणवून बाबांनी दाखविलें. पण द्वैत निर्माण होतांच त्याची परब्रह्मापासून फारकत होते. मग द्वैताला ठाव कोणता ? तर मन ! मनांतच द्वैत रहिवास करितें. ' रहातें ' हें मनाचें प्रतीक. दोघांचा जाहला विचारू। रहिवास करूं रहात्यांत ॥ "

ध्याता व ध्येय, शिष्य व गुरु यांची अशी तन्मयता—नुसते नामधारी नातें नव्हे—झाल्यावर, शिष्य गुरुसेवा कशी करतो ? तर.

'गुरुमुखांतून बाहेर आलें'। योग्यायोग्य नाहीं पाहिलें ॥
वचन वरचेवरी झेलिलें। पाणीही वाहिलें गुरुगृहीं ॥

५·१२७

'जैसे कनक आणि कांतीं। जैसा दीप आणि दीप्ति ॥
तैसीच हे गुरुशिष्यस्थिति। ऐक्य प्रतीति उभयांसी ॥

५·१३४

ही महावाक्याची धारणा होणेंपूर्वी साधकाचें आचारविचार यमनियमयुक्त असतात. तो माणसांत असतो. त्यामुळें इतरेजनांना तो सुज्ञ वाटतो. पण एकदां कां त्याला महावाक्याचा बोध झाला कीं तो उन्मनी अवस्थेंत जातो. आचारविचारांचें त्याला भान रहात नाहीं. अक्षरशः तो माणसांतून उठतो. लोक त्याला वेडापिसा समजतात.

ऐसें वरचेवर होऊं लागलें। राहत्यासींचि राहूं लागले।
फारचि फकीरा नादीं भरले। वाटले अंतरले शिरडीला ॥"

५·१२९

तो विषयांची व इंद्रियांची कदर करीत नाहीं. किंवा व्यवहारांत नात्यागोत्यांचें संबंध तोडून टाकतो. परंतु जीवात्म्याच्या चैतन्यावरच विषय व इंद्रियें यांचा व्यापार चालत असल्यामुळें त्यांना त्याचा या उन्मनी अवस्थेंतील वियोग जाणवतो. तो माणसांतून उठला असें पाहून त्याचे आप्तेष्टाना तें जाणवतें.

' शिरडीस्थ बाबांचे प्रेमी भक्त। बाबांचे ठायीं अति आसक्त ॥
तयांते बाबांपासून वियुक्त। राहणें अयुक्त वाटलें ॥'

५·१३२

इंद्रियें व विषय त्याच्याकडे दाद मागतात. आप्तेष्टही त्याला चार समजुतीच्या गोष्टी सांगतात.

" पाहूं प्रयत्न वेंचूनि प्रबळ।बाबांसह सकळ मग परतूं ॥"

५·१३५

ह्या अवस्थेंतलि निजहित साधक स्वतः जाणवतों. पण इंद्रियें व इतर जन यांना त्यातले रहस्य समजत नाहीं. तेव्हां तो त्यांना वाटेला कसा लावतो ?

" बाबा तैं देती उलट बुद्धी · 'फकीर आहे महाक्रोधी ॥
' लागूं नका तयाचें नादीं। तो मज कधींच न विसंबे ॥ १३६

' तुम्ही येथून करा पलायन । आतांच येईल गावांतून ॥
करील तुमचें निसंतान । परमकठीण क्रोध त्याचा ॥ १३७

' राग तयाचा मोठा कडक । येताच होईल लाल भडक ॥
जाजा निघून जा कीं तडक । धरा कीं सडक शिरडीची ' १३८

येथें बाबांनीं फारच कोटीयुक्त भाषा वापरली आहे. एकीकडे स्वतःला अनुलक्षून सात्वीक अहंकार घेतला आहे. पण भक्तांना उद्देशून देहाहंकाराचें भीषण स्वरूप वर्णन केलें आहे. म्हणजे एकीकडे साधकावस्थेंतील इंद्रियांना संयम शिकविला तर दुसरीकडे भक्तजनांना देहाहंकार टाकून देणेचा उपदेश केला. अशी ही व्यर्थी भाषा आहे. तेव्हां ती समजणेस आपणांस दोन्ही अर्थांची फोड केली पाहिजेः—

## इंद्रियांना जीवात्मा काय बोध देतो ?

' बाबांनो मी सात्वीक अहंकाराच्या आहारीं गेलों आहे. मला आतां परत विषयांत गुरफटण्याच्या भानगडींत पडूं नका. त्या सात्वीक अहंकाराचा तडाखा इतका आहे कीं तो तुम्हाला नामोहरम करील. तेव्हां त्याच्या नादीं न लागतां आहां तसेंच जर तुम्हीं राहिला तरच कांहीं गति होईल. कारण मी सर्वस्वीं त्याच्या आधीन होईपर्यंत तो तुम्हांला छळून काढलि. उलट मी त्याच्या सर्वस्वीं आधीन झालों कीं—जीवन्मुक्तावस्थेंत—तो मला तुमच्या तंत्रानें चालून देईल. तेव्हां ही उन्मनी अवस्था जाईपर्यंत त्याच्याच तंत्राने चालणें इष्ट तेव्हां तुम्हीं स्वस्थ असा ! ”

## आतां भक्तजनांस काय सांगतात'?

' तुम्हीं मला ताळ्यावर आणणार हा जो अहंकार तुम्हांला झाला आहे तो तामसी आहे. त्याच्या नादीं तुम्हीं लागूं नका. नेहमीं त्याच्यापासून दूर रहा. हा देहाहंकार तुमचें निसंतान करील. त्याच्याइतका घातुक दुसरा कोणी नाहीं. त्यानेंच तर तुम्हांला मायेंत बांधून टाकलें आहे. तेव्हां शहाणपणाचा मार्ग ' माझी परीक्षा करणेचें सोडून ' मला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न सोडून तुम्हीं हा देहाहंकारच सोडून द्या व ' धरा कीं सडक शिरडीची. ' आत्मोन्मुख होऊन मोक्षानुकूल कर्मं करा ! ”

ह्या थराला उन्मनी अवस्था आली कीं आत्मसाक्षात्कार होण्याचा वेळ येतो.

“ इतक्यांत फकीर आला अवचित । ” जाहला पुसतां तयांतें ॥ '
१·१३९

फकीर ही व्यर्थी भाषा वापरतो.

तो इंद्रियांना काय सांगतो ? "आलांत काय पोरासाठीं । " तुम्ही जीवात्म्याला परत विषयांत गुरफटू पहातां ? 'परी या कष्टीं पडूं नका ! ' आतां तो तुमच्या आहारीं कदापि जाणार नाहीं. तर तुम्हांलाच आपल्या तंत्रानें वागवील. " म्हणजे येथें तत्त्वतः साधक जीवन्मुक्तावस्थेंत गेला. पण बाबांनीं हें दाखविण्यासाठीं जें सगुण नाटक नटविलें आहे. त्याचे भरतवाक्य अजून होणें आहे. त्याकरितां आणखी नाटक चालविलें हें पाहिजेच.

तो फकीर त्या भक्तजनांना काय म्हणतो ?—

'आलांत काय पोरासाठीं । काय करितसां येथें गोष्टी ।
'शिरडीस माघारा न्यावें हें पोटीं ।—५ १४०॥ '

मग 'मलाहि घेऊनि चला । सर्वे मुलाला नेऊं कीं ॥ ' ५·१४१

द्वैत शिरडींत उद्भवलें. रहात्यांत पोसलें गेलें. पण अखेर शिरडींतच निमालें ! तें कसें ? तरः—

'साई परब्रह्म पुतळा । जव्हारअली भ्रमाचा भोपळा ॥
देवादासे कसास लाविला । भोपळा फुटला शिरडींत ॥ ' ५·१४१

जीवात्मारूप साधक साई जव्हारअलीरुप सात्वीक अहंकारासह शिरडी परब्रह्मांत आला कीं त्याला देवदासरूपीं महाज्ञानी परमात्मा भेटतो. म्हणजे तो जीवनमुक्त होतो. येथें नाटकाच्या परिपूर्तिसाठीं स्वतःला जीवात्मा भावून बाबांनीं देवदासास परमात्म्याची—आत्मज्ञानाची भूमिका दिली आहे. जीवात्मा परमात्म्याची भेट झाली कीं 'सोऽहं ' सात्वीक अहंकाराचें निरसन आपोआपच होतें. ते कसें ?

तयापुढें तो फकिर आणिला । शास्त्रीय वादविवाद मांडिला ॥
वैराग्यानें फकीर जिंकला । हाकूंनि लाविला तेथूनि ॥ ५।१५०

सात्वीक अहंकारांत उन्मन्नी अवस्थेंत 'सोऽहं ' ' तत्त्वमसि ' या महामाक्यांचें ध्यान असतें. अर्थात तेथें ध्याता, ध्यान व ध्येय ही त्रिपुटि असतें. बाबा ध्याता जव्हारअली ध्यान व देवदास ध्येय. पण आत्मज्ञान झालें कीं एकमेव अद्वैतच दिसतें. अर्थात् 'सो ऽ हं, ' तत्त्वमसि ' यांचाही विराम होतो. तेथें ' सः ' पण नाहीं. ' अहं ' पण नाहीं. ' तत् ' पण नाहीं 'त्वम्' पण नाहीं. तर फक्त ' असि ' हें एकमेव चैतन्य स्वानुभवास येते. अहंकाराचे समूळ निरसन होतें ' हाकूनि लाविला तेथुनि ॥

वस्तुतः येथें नाटक संपलें ! पण रूपकांत जव्हारअली अजून शिल्लक आहे व तत्त्वतः तर अहंकाराचें समूळ निरसन झालें तें रूपकांत कसें दाखवावयाचें ? तर जवाहरअलीच्या तोंडूनच भरतवाक्य म्हणवून बाबांनी नाटकाचा पडदा पाडला आहे.

" आपण गुरु साई चेला । हा सर्व त्याचा भ्रम निरसला ॥
बाबांनीही पूर्ववत सत्कारिला । शुद्ध झाला पश्चात्तापें ॥ " ५·१५२

त्या जव्हारअलीरूप अहंकाराला कळतें कीं मी सात्विक अहंकार झालों तरी जीवात्म्याहून श्रेष्ठ नाहीं. कारण जीवात्मा हा तत्त्वतः परमात्माच आहे. व माझी उत्पत्ति त्याच्यापासूनच आहे, ' मी त्याच्याच चैतन्यावर जीव धरून आहे. अर्थात् माझा लयही त्याच्यांतच होणार ! ' ह्या पश्चात्तापानें तो शुद्ध जाहला कीं तो जीवात्म्याला शरण जाऊन काय म्हणतो ?—

' मी गुरु तुज अति श्रेष्ठ । बरा उपकार फेडिला ॥ '

शनिमहात्म्य ३१७

पण जीवात्म्यानें प्रथम त्याला गुरू भाविला होता. तेव्हां हें जाणून तो त्याचा सत्कार कसा करतो ? तरः—

' गुरुजी तुम्हांस गर्व जाहला । म्हणोनि हा अपराध घडला ॥ '

शनिमहात्म्य ३२०

अशा रीतीनें ' नमस्कारिला साईनाथ ॥ ' ५·१५१
आणि नाटक संपलें !

प्रस्तुत कथेंतील रुपक जर नीट ध्यानांत घेतलें नाहीं व केवळ वाच्यार्थानेंच त्याकडे पाहिले तर दिशाभूल होणेचा बराच संभव आहे. एकदां एक गुरु भाविला कीं

' गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ '

अशी भावना ठेऊन,

' बालस्य वा विषय भोगरतस्य वापि ।
मूर्खस्य सेवक जनस्य गृहस्थितस्य ।
एतद्गुरोः किमपि नैव न चिन्तनीयम् ।
रत्नं कथं त्यजति कोऽप्यशुचौ प्रतिष्ठम् ॥

अवधूतगीता २. १.